अपंग व्यक्ती (समानसंधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ च्या अनुषंगाने केंद्र शासनाने अपंगांच्या पदनिश्चितीबाबत प्रसिध्द केलेल्या यादीनुसार सामाजिक न्याय विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील गट-अ, ब, क व गट-ड मधील पदांवर शारीरिकदृष्टया अपंगासाठी सुयोग्य पदे निश्चित करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्र. सकआ २०१०/प्रक्र ३७७/आस्था-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ११ जानेवारी, २०११

वाचा : (१) अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५
(२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. सकआ २००८/प्रक्र १८५/ आस्था-२, दि. ०८ ऑगस्ट, २००८
(३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. न्यायाप्र २००९/प्रक्र ५/सुधार-३, दि.०३ ऑगस्ट, २०१०
(४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही -१०९९/प्रक्र ३७/९९/१६-अ, दि.५/३/२००२
(५) संचालक, समाज कल्याण, पुणे यांचे पत्र क्र. सकसं/आस्था/काअ/ ज.या.२२५-२००९/ २०११/ का-६/६७, दि. १० जानेवारी, २०११
(६) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.अकआ/अपंगांसाठी सुयोग्य पदे/२०१०-११/३७०६, दि.१/१०/२०१०

**प्रस्तावना : -**

अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ दि.७ फेब्रुवारी, १९९६ पासुन लागू झाला आहे. या कायद्यान्वये अपंगांच्या सर्वांगिण विकासासाठी व त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी शासन सेवेत ३% पदे आरक्षित करण्याची तरतूद आहे. त्यानुसार सरळसेवा भरतीच्या पदांवर अपंगांना आरक्षण विहित करणे / सुट देणे या संदर्भात याचिका क्र.१२९/०३ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार व पुर्नरचित तज्ञ समितीने केलेल्या सुधारणांनुसार सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील गट-अ ते गट-ड संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या पदांसाठी संदर्भ क्र.३ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. आता अपंग व्यक्तींसाठी सुधारित पद निश्चिती करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.२२५/२००९ मध्ये मा.उच्च न्यायालयाने, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार, अपंगांसाठी शासकीय/ निम शासकीय सेवेतील आरक्षित पदे सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरुन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने संदर्भ क्र.२ अन्वये असे कळविले आहे की, केंद्र शासनाने, अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ मधील तरतुदीस अनुसरुन, त्यांच्या अखत्यारितील आस्थापनेवरील अपंग व्यक्तींसाठी पदे निश्चित करुन यादी प्रसिध्द केलेली आहे. केंद्र शासनाच्या या यादीनुसार राज्य शासनाच्या अखत्यारितील शासकीय व निम शासकीय आस्थापनेवरील जी पदे समान आहेत ती पदे संबंधित विभागांनी अपंगांसाठी निश्चित करण्यासाठी आदेश निर्गमित करावेत.

२. त्यास अनुसरुन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील सरळसेवेने भरण्यात येणाऱ्या गट-अ ते गट-ड संवर्गातील पदांबाबत अपंगांसाठी पदे सुनिश्चित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

*कृ.मा.प.....*

**शासन निर्णय** :-

संदर्भाधीन दि.०८/०८/२००८ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे सुधारीत आदेश देण्यात येत आहेत.

२. अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार केंद्र शासनाने ज्या यादीन्वये त्यांच्या अखत्यारितील आस्थापनेवरील जी पदे अपंग व्यक्तींसाठी आरक्षण देण्यासाठी निश्चित केलेली आहेत त्या यादीशी तुलना करुन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिपत्याखालील (१) संचालक, समाज कल्याण, पुणे, व (२)आयुक्त, अपंग कल्याण, पुणे, या कार्यालयातील गट-अ ते गट-ड या संवर्गातील सरळसेवा भरतीने भरावयाच्या पदांसाठी (केंद्र शासनाच्या यादीतील समान पदे विचारात घेऊन) सोबत जोडलेल्या अनुक्रमे परिशिष्ट "अ" व "ब" मधील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अपंगांसाठी पदे सुनिश्चित करण्यात येत आहेत.

३. अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम १९९५ या अधिनियमातील कलम ३२ व ३३ अनुसार संचालक, समाज कल्याण, पुणे व आयुक्त, अपंग कल्याण,पुणे यांच्या आस्थापनेअंतर्गत गट-अ ते गट-ड या संवर्गातील पदांवरील सरळसेवा भरतीमध्ये किमान ४०% अपंगत्व असलेल्या अपंग व्यक्तींसाठी प्रत्येकी १% याप्रमाणे ३% आरक्षण लागू राहील. तसेच गट-क व गट-ड मध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०५/०३/२००२ च्या शासन निर्णयाप्रमाणे पदोन्नतीमध्ये आरक्षण लागु राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक सांकेतांक क्रमांक २०११०१११२१०७३१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( कि. पां. वडते )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र : परिशिष्ट "अ" व "ब"

प्रति,
१) संचालक, समाजकल्याण, पुणे.
२) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे.
३) संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती, इमाव व विमाप्र कल्याण, पुणे.
४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
५) सर्व उपसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा. राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव (सामाजिक न्याय) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
११) सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी.
१२) सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी.
१३) सर्व समाजकल्याण अधिकारी, गट-अ,जिल्हा परिषद.
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१५) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१६) निवड नस्ती (आस्था-२)

परिशिष्ट-अ

अपंग व्यक्तीसाठी सुयोग्य पदाची निश्चिती

प्रशासकीय नाव : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०

कार्यालयाचे नाव : समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व अधिनस्त कार्यालय

| क्र. | पदनाम | शारिरीक योग्यता | सुयोग्य पदासाठी अपंगत्वाचा संवर्ग | पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | संचालक | S,C,W,SE,RW,ST | OL,OA,B,LV,HH | प्रशासकीय विभाग प्रमुख | भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी |
| २ | अतिरिक्त संचालक | S,C,W,SE,RW,ST | OL,OA,B,LV,HH | प्रशासकीय विभाग प्रमुख यांच्या कामकाजात सहाय्य करणे. | एकाकी पदोन्नतीचे पद |
| ३ | सह संचालक | S,C,W,SE,RW,ST | OL,OA,B,LV,HH | अजाउयो व शिक्षण शाखेचे प्रमुख म्हणून कामकाज पहाणे. | -- |
| ४ | उप संचालक/विभागीय समाज कल्याण अधिकारी | S,C,W,SE,RW,ST | OL,OA,B,LV,HH | मुख्यालय स्तरावर योजनांची अंमलबजावणी तसेच विभागीय प्रमुख म्हणून कामकाज पहाणे. | -- |
| ५ | सहाय्यक संचालक/संशोधन अधिकारी /विशेष अधिकारी/ विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी/समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद. | S,C,W,SE,RW,ST | OL,OA,B,LV,HH | उपसंचालक/विभागीय अधिकारी यांना सहाय्य करणे. | -- |

| क्र. | पदनाम | शारिरीक योग्यता | सुयोग्य पदासाठी अपंगत्वाचा संवर्ग | पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| ६ | विशेष अधिकारी (भासशि)/ विशेष अधिकारी (अ.नि)/ सांख्यिकी अधिकारी (अजाउयो)/समाज कल्याण अधिकारी गट-ब/गृहप्रमुख. | S,C,W,SE,RW,ST | OL,OA,B,LV,HH | वर्ग-१ संवर्गातील अधिकाऱ्यांना सहाय्य करणे. | -- |
| ७ | उच्चश्रेणी लघुलेखक | S,ST,W,L,MF,RW,H,C | OA,OL,BL,OAL,B,LV | श्रुतलेखन घेणे व टंकलिखीत करणे. स्वीय सहाय्यक म्हणून कामकाज करणे. | -- |
| ८ | कार्यालय अधिक्षक | S,C,W,SE,RW,ST | OL,OA,B,LV,HH | लिपीकवर्गीय कर्मचाऱ्यांवर पर्यवेक्षण करणे, कार्यालयीन कामकाजावर देखरेख ठेवणे, लिपीकवर्गीयांच्या फाईल्स तपासून त्या अधिकारीवर्गाकडे सादर करणे व कार्यालयीन कामकाज व्यवस्था पाहणे. | -- |
| ९ | वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक | S,ST,W,BN,MF,SE,RW | OA,OL,BL,OAL,B,LV | अनुसूचित जाती उपयोजना/ आश्रमशाळा विभागाचे कामकाज पहाणे. | -- |
| १० | गृहपाल | S,RW,W,ST,BN,MF | OA,OL,BL,LV | वसतिगृहाचे प्रमुख म्हणून कामकाज पाहाणे तसेच प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक,निवास, भोजन इत्यादी सुविधांवर देखरेख करणे. | -- |

| क्र. | पदनाम | शारिरीक योग्यता | सुयोग्य पदासाठी अपंगत्वाचा संवर्ग | पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| ११ | निम्नश्रेणी लघुलेखक | S,ST,W,L,MF,RW,H,C | OA,OL,BL,OAL,B,LV | श्रुतलेखन घेणे व टंकलिखीत करणे. स्वीय सहाय्यक म्हणून कामकाज करणे. | -- |
| १२ | प्रमुख लिपीक | S,ST,W,RW,H,C | OA,OL,BL,OAL,B,LV,HH | लिपीक स्वरुपाचे सर्व कामकाज करणे. | -- |
| १३ | समाज कल्याण निरीक्षक | S,ST,W,BN,MF,SE,RW | OA,OL,BL,OAL,B,LV | विभाग/जिल्हास्तरावर योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे. | -- |
| १४ | वरिष्ठ लिपीक | S,ST,W,RW,H,C | OA,OL,BL,OAL,B,LV,HH | लिपीक स्वरुपाचे सर्व कामकाज करणे. | -- |
| १५ | लघुटंकलेखक | S,ST,W,L,MF,RW,H,C | OA,OL,BL,OAL,B,LV | श्रुतलेखन घेणे व टंकलिखीत करणे. | -- |
| १६ | कनिष्ठ लिपीक | S,ST,W,RW,H,C | OA,OL,BL,OAL,B,LV,HH | लिपीक स्वरुपाचे सर्व कामकाज करणे. | -- |
| १७ | वाहनचालक | -- | -- | वाहन चालविणे | -- |
| १८ | उद्वाहक | S,ST,W,PP,L,KC,SE,RW,C,MF | OA,OL,HH,LV,B | उद्वाहन चालविणे | -- |
| १९ | दप्तरी | S,ST,W,PP,L,KC,SE,RW,C,MF | OA,OL,HH,LV,B | अभिलेख जतन करण | -- |
| २० | शिपाई | S,ST,W,PP,L,KC,SE,RW,C,MF | OA,OL,HH,LV,B | कार्यालयाची स्वच्छता ठेवणे, वरिष्ठ अधिकाऱ्यांना रेकॉर्ड उपलब्ध करुन देणे इत्यादि स्वरुपाचे कामकाज करणे तसेच कार्यालयीन टपालाचे वाटप करणे. | -- |

| क्र. | पदनाम | शारिरीक योग्यता | सुयोग्य पदासाठी अपंगत्वाचा संवर्ग | पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| २१ | पहारेकरी | S,ST,W,PP,L,KC,SE,RW,C,MF | OA,OL,HH,LV,B | शासकीय इमारत/वसतिगृह इमारतीचे पहारेकरी म्हणून देखरेख करणे. | -- |
| २२ | हवालदार | S,ST,W,PP,L,KC,SE,RW,C,MF | OA,OL,HH,LV,B | शिपाई संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे. | -- |
| २३ | नाईक | S,ST,W,PP,L,KC,SE,RW,C,MF | OA,OL,HH,LV,B | शिपाई संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे. | -- |
| २४ | माळी | S,ST,W,PP,L,KC,SE,RW,C,MF | OA,OL,HH,LV,B | शासकीय इमारतीमधील बाग-बगीच्याचे कामकाज करणे. | -- |
| २५ | स्वयंपाकी | S,ST,W,MF,SE,RW,H | OL,LV,HH | वसतिगृहातील मुलांसाठी जेवण तयार करणे. | -- |
| २६ | मदतनीस | S,ST,W,MF,SE,RW,H | OL,LV,HH | स्वयंपाकी यांच्या कामकाजात भाजीपाला निवडणे, धान्य निवडणे, मुलांना जेवण वाढणे, स्वयंपाकाची भांडी स्वच्छ करुन ठेवणे इत्यादि मदत करणे. | -- |

| क्र. | पदनाम | शारिरीक योग्यता | सुयोग्य पदासाठी अपंगत्वाचा संवर्ग | पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| २७ | सफाईगार | ST,L,SE | OL,BL,HH,LV | कार्यालय/वसतिगृह इमारतीची तसेच त्यातील स्वच्छतागृहे व स्नानगृहे यांची स्वच्छता राखणे | -- |

**Abbreviations used :- S-** Sitting, **BN**- Bending, **SE**-Seeing, **RW-** Reading and Writing, **C**- Communication, **MF-** Manipulation by Fingers, **PP-**Pulling and Pushing, **L-** Lifting, **KC-** Kneeling and Croutching, **ST**- Standing, **W-** Walking, **BLA-** Both legs and Arms, **BA-**Both Arms, **OL-** One leg, **BL**- Both legs, **OA**-One Arm, **OAL** -One Arm one leg, **B-** Blind, **LV**- Low Vision, **H**- Hearing, **MW-**Muscular Weakness.

**OH-** Orthopedically Handicapped, **CP-** Cerebral Palsy, **LC-**Leprosy Cured, **VH-** Visually Handicapped, **HH**- Hearing Handicapped.

# परिशिष्ट-ब

## अपंग व्यक्तींसाठी सुयोग्य पदांची निश्चिती.

**प्रशासकीय विभागाचे नांव :- सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**कार्यालयाचे नांव :- अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व अधिनस्त कार्यालय**

| अक्र. | पदनाम | शारिरीक योग्यता | सुयोग्य पदासाठी अपंगत्वाचा संवर्ग | पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १) | आयुक्त, भाप्रसे | S, C, W,SE, RW, ST | OL, OA, B, LV, HH | प्रशासकीय विभाग प्रमूख म्हणून कामकाज, अपंग कायद्यांची अंमलबजावणी सनियंत्रण व समन्वय आणि सक्षम अधिकारी. | भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी |
| २) | उप आयुक्त (गट -अ) | S, C, W,SE, RW, ST | OL, OA, B, LV, HH | आयुक्तांच्या प्रशासकीय विभाग प्रमूख म्हणून कामकाज, अपंग कायद्यांची अंमलबजावणी सनियंत्रण व समन्वय आणि सक्षम अधिकारी या कामकाजात सहाय्यक | एकाकी व पदोन्नतीचे पद |
| ३) | जिल्हा अपंग पुनर्वसन अधिकारी (गट अ) | S, C, W,SE, RW, ST | OL, OA, B, LV, HH | प्रशासकीय कामकाज, आहरण व वितरण अधिकारी म्हणून कामकाज नियंत्रण व पर्यवेक्षण | एकाकी व पदोन्नतीचे पद |
| ४) | सहाय्यक आयुक्त (गट अ) | S, C, W,SE, RW, ST | OL, OA, B, LV, HH | आयुक्तांच्या व उप आयुक्तांच्या प्रशासकीय विभाग प्रमूख म्हणून कामकाज, अपंग कायद्यांची अंमलबजावणी सनियंत्रण व समन्वय आणि सक्षम अधिकारी या कामकाजात सहाय्यक | एकाकी व पदोन्नतीचे पद |
| ५) | निरीक्षक (गट ब) | S,ST,W,BN,MF,SE,W | OA,OL,BL,OAL,B,LV | अपंगांच्या विशेष शाळा / कार्यशाळांची तपासणी करणे, शाळा / कार्यशाळांतील प्रशासकीय व सेवा विषयक बाबींचा पत्रव्यवहार करणे, विशेष शाळा / कार्यशाळांच्या नोंदणी प्रमाणपत्र, मान्यता अनुदान व विद्यार्थी संख्यावाढ इत्यादी प्रकरणे तपासणे. | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६) | लेखाधिकारी (गट ब) | S,BN,SE,RW,MF,H,C | BL,OA,OL,HH | लेखा विषयक कामकाज, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कामकाज, अर्थ संकल्प, खर्चावर नियंत्रण, शाळा / कार्यशाळांतील कर्मचाऱ्यांच्या सेवा व सेवा पुस्तकांविषयी पडताळणी करणे इत्यादी | -- |
| ७) | लघुलेखक उच्चश्रेणी (गट ब) | S,ST,W,L,MF,RW,H,C, | OA,OL,BL,OAL,B,LV | श्रुतलेखन घेणे व टंकलिखीत करणे स्वीय सहाय्यक म्हणून कामकाज पाहाणे | -- |
| ८) | अधिक्षक (अपंग संस्था) (गट ब) | S,RW,W,ST,BN,MF | OA,OL,BL,LV | संस्थांचे संस्था प्रमूख म्हणून कामकाज पाहाणे तसेच निवासी विद्यार्थ्यांच्या निवास व भोजन सुविधेवर देखरेख करणे | -- |
| ९) | अधिक्षक (अराजपत्रित) (गट क) | S,RW,W,ST,BN,MF | OA,OL,BL,LV | संस्थांचे संस्था प्रमूख म्हणून कामकाज पाहाणे तसेच निवासी विद्यार्थ्यांच्या निवास व भोजन सुविधेवर देखरेख करणे | -- |
| १०) | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता (गट क) | S,ST, W, SE, RW,H,C | OA,OL,OAL,BL,LV,HH | अपंगांना मार्गदर्शन व सल्ला देणे, प्रशासकीय कामकाज, तपासणी, योजनांची अंमलबजावणी विषयक कार्यवाही, अपंग मेळावे, मार्गदर्शन शिबीरे आयोजित करणे. | -- |
| ११) | लघुलेखक निम्नश्रेणी (गट क) | S,ST,W,L,MF,RW,H,C, | OA,OL,BL,OAL,B,LV | श्रुतलेखन घेणे व टंकलिखीत करणे स्वीय सहाय्यक म्हणून कामकाज पाहाणे | -- |
| १२) | सहाय्यक लेखाधिकारी (गट क) | S,BN,SE,RW,MF,H,C | BL,OA,OL,HH | लेखा विषयक कामकाज, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कामकाज, अर्थसंकल्पीय, खर्चावर नियंत्रण, शाळा / कार्यशाळांतील कर्मचाऱ्यांच्या सेवा व सेवा पुस्तकांविषयी पडताळणी करणे इत्यादी | -- |
| १३) | व्यवसाय उपचार तज्ञ (गट क) | S,ST,BN,SE,RW,H | OL,HH | अस्थिव्यंग अपंगांना व्यवसाय उपचार थेरापी देणे कृत्रिम अवयव साधने वापरणे व त्यांची देखभाल करण्याचे अपंगांना प्रशिक्षण देणे | -- |
| १४) | भौतिक उपचार तज्ञ (गट क) | S,ST,W,MF,SE,RW,H,C | OL,LV,BL,HH | अस्थिव्यंग अपंगांना भौतिक उपचार थेरापी देणे कृत्रिम अवयव साधने वापरणे व त्यांची देखभाल करण्याचे अपंगांना प्रशिक्षण देणे | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५) | श्रवण व वाचा उपचार तज्ञ (गट क) | S,ST,W,MF,SE,RW,H | OL,LV,HH | कर्णबधिर विद्यार्थ्यांच्या श्रवण व रास आलेख काढणे व श्रवण व वाचा उपचार करणे | -- |
| १६) | मोबिलिटी इंन्स्ट्रक्टर (गट क) | ST,W,MF,SE,H,C | OA,OL | अंध विद्यार्थ्यांना मोबिलीटीचे (चलन वलनाचे प्रशिक्षण देणे) | -- |
| १७) | सहाय्यक सल्लागार (गट क) | S,ST, W, SE, RW, H,C | OA,OL,OAL,BL,LV,HH | अपंगांना मार्गदर्शन व सल्ला देणे, प्रशासकीय कामकाज, तपासणी, योजनांची अंमलबजावणी विषयक कार्यवाही, अपंग मेळावे, मार्गदर्शन शिबीरे आयोजित करणे. | -- |
| १८) | निदेशक (गट क) | S,ST,W,BN,L,SE,RW,H, C | OL,BL,LV,HH | अपंग व्यक्तींना त्यांच्या अपंगत्वानुरुप सोयीस्कर अशा व्यवसायाचे प्रशिक्षण देणे | -- |
| १९) | परिचारीका (गट क) | S,ST,W,MF,SE,RW,H,C | OL | अपंग विद्यार्थ्यांची सुश्रृशा व औषधे उपचार व आरोग्य विषयक देखभाल करणे इत्यादी | -- |
| २०) | लेखापाल-नि-रोखपाल (गट क) | S,ST,W,RW,H,C | OA,OL,BL,OAL,B,LV,HH | लिपीक संवर्गीय व संस्थेचे लेखा विषयक कामकाज करणे. | -- |
| **२१)** | **विशेष शिक्षक (गट क)** | | | | |
| | अ) विशेष शिक्षक - मूकबधिर | S,ST,W,MF,SE,RW,H,C | OA,OL,OAL,BL | मूकबधिर विद्यार्थ्यांना ओष्टवाचन, खाणा खुणांची सांकेतीक भाषा (साईन लॅगेवेज)च्या माध्यमातून शिकविणे तसेच इलेक्ट्रॉनिक, श्रवण उपकरणांचा व साधनांचा वापर करण्याचे प्रशिक्षण देणे इत्यादी | -- |
| | ब) विशेष शिक्षक - अंध | S,ST,W,MF,SE,RW,H,C | OA,OL,OAL,BL,B,LV | अंध विद्यार्थ्यांना ब्रेल लिपीतून अद्यापन करणे तसेच ब्रेल शैक्षणिक साधनाचा अद्यापनामध्ये वापर करणे | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | क) विशेष शिक्षक सर्वसाधारण | S,ST,W,L,SE,RW,H,C | OA,OL,OAL,BL,B,LV | प्रवेशित अपंग विद्यार्थ्यांना शारिरीक, बौध्दीक तसेच सामाजिक विकासाच्या दृष्टीकोनातून व प्रचलित अभ्यासक्रमानुसार अद्यापन करणे. | -- |
| २२) | कला शिक्षक (गट क) | S,ST,W,BN,L,SE,RW,H,C | OL,BL,HH, | अपंग विद्यार्थ्यांना त्यांच्या अपंगत्वानुरुप सोयीस्कर अशा वेगवेगळया कलेचे व्यवसाय पूर्वक शिक्षण देणे. | -- |
| २३) | प्रमूख लिपीक (गट क) | S,ST,W,RW,H,C | OA,OL,BL,OAL,B,LV,HH | लिपीक स्वरुपाचे सर्व कामकाज करणे | -- |
| २४) | वरिष्ठ लिपीक (गट क) | S,ST,W,RW,H,C | OA,OL,BL,OAL,B,LV,HH | लिपीक स्वरुपाचे सर्व कामकाज करणे | -- |
| २५) | कनिष्ठ लिपीक (गट क) | S,ST,W,RW,H,C | OA,OL,BL,OAL,B,LV,HH | लिपीक स्वरुपाचे सर्व कामकाज करणे | -- |
| २६) | वाहन चालक (गट क) | | | वाहन चालविणे | केंद्र शासनाने अपंगांसाठी सुनिश्चीत केलेल्या पदांच्या यादीत हे पद नाही तेव्हा हे पद तज्ञ समितीकडून वगळण्यात यावे |
| २७) | शिपाई (गट ड) | S,ST,W,PP,L,KC,SE,RW, C,MF | OA,OL,HH,LV,B | कार्यालयाची स्वच्छता ठेवणे, वरिष्ठ अधिकाऱ्यांना रेकॉर्ड उपलब्ध करुन देणे इत्यादी स्वरुपाचे कामकाज करणे तसेच कार्यालयीन टपालाचे वाटप करणे | - - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २८) | स्वयंपाकी (गट ड) | S,ST,W,MF,SE,RW,H | OL,LV,HH | अपंग संस्थांमधील विद्यार्थ्यांचा स्वयंपाक करणे, भाजी पाला निवडणे, धान्य निवडणे, मुलांना जेवण वाढणे, स्वयंपाकाची भांडी स्वच्छ करुन ठेवणे इत्यादी | -- |
| २९) | मदतनीस (गट ड) | S,ST,W,MF,SE,RW,H | OL,LV,HH | स्वयंपाकी याच्या कामकाजात अपंग संस्थांमधील विद्यार्थ्यांचा स्वयंपाक करणे, भाजी पाला निवडणे, धान्य निवडणे, मुलांना जेवण वाढणे, स्वयंपाकाची भांडी स्वच्छ करुन ठेवणे इत्यादीसाठी मदत करणे. | --- |
| ३०) | सफाईगार (गट ड) | ST,L,SE, | OL,BL,HH,LV | संस्थेच्या इमारतीच्या खोल्याची झाड लोट करणे, अंगण व मैदान स्वच्छ ठेवणे, स्वच्छतागृहे व स्नानगृहे यांची स्वच्छता ठेवणे तसेच वरिष्ठांच्या सूचनांनुसार स्वच्छता विषयक कामकाज करणे इत्यादी | -- |
| ३१) | पहारेकरी (गट ड) | ST,W,SE | OL,BL,HH | अपंग संस्थेचे पहारेकरी म्हणून देखरेख करणे. | -- |
| ३२) | माळी (गट ड) | S,ST,W,F,PP,L,B | OL,HH,LV,B | अपंग संस्थांमधील बाग बगीचेचे कामकाज करणे | --- |
| ३३) | शू मेकर / लेदर वर्कर / कर्मकार (गट ड) | S,MF,SE | BL,OH, HH | अस्थिव्यंग अपंगांसाठी करेक्टीयू शूज व कॅलीपर्स शूल अथोटीक इंजिनियर यांच्या मदतीने तयार करणे | --- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३४) | विधी अधिकारी (एकत्रित वेतनावर ) | S,ST,W,SE,H,C | OA,OL,OAL,BL,LV,B | न्यायालयीन प्रकरणामध्ये प्रतिज्ञापत्र दाखल करणेकरिता प्रारुप तयार करणे व न्यायीक सल्ला देणे इत्यादी न्यायलयीन विषयक कामकाज व आयुक्तालयातील अभिमत न्यायालयाचे कामकाज. | -- |
| ३५) | मानद वैद्यकीय अधिकारी (मानधन) | -- | -- | प्रवेशित विद्यार्थ्यांची आरोग्याची तपासणी करणे व औषधोपचार करणे इत्यादी | सदरचे पद मानधनावरील असल्याने केंद्र शासनाच्या यादीमध्ये समाविष्ठ नाही. तथापी सदरचे पद सुनिश्चीत प्रक्रियेमधून वगळण्यात यावे. |
| ३६) | मानद मानस उपचार तज्ञ (मानधन) | S,RW,W,ST,BN, | OL,BL,OA | अपंग विद्यार्थ्यांच्या मानसिक समस्येचा अभ्यास करुन मानसोपचार पध्दती अवलंबविणे व मुलांचा बुध्यांक काढणे. | -- |
| ३७) | अर्धवेळ शिक्षक (मानधन) | – | -- | प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी अद्यापना विषयीचे कामकाज करणे | सदरचे पद मानधनावरील असल्याने केंद्र शासनाच्या यादीमध्ये समाविष्ठ नाही. तथापी सदरचे पद सुनिश्चीत प्रक्रियेमधून वगळण्यात यावे. |
| ३८) | संगित शिक्षक (मानधन) | S,ST,BN,MF,SE,RW,H,C | OL,BL,B,LV | अपंग विद्यार्थ्यांना गायन, वाधनांचे शिक्षण देणे | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३९) | कवायत निदेशक (मानधन) | - | - | प्रवेशित अपंग विद्यार्थ्यांना कवायत व व्यायाम शिकविणे | सदरचे पद मानधनावरील असल्याने केंद्र शासनाच्या यादीमध्ये समाविष्ठ नाही. तथापी सदरचे पद सुनिश्चीत प्रक्रियेमधून वगळण्यात यावे. |

**Abbreviations used** - S- Sitting, BN - Bending, SE- Seeing, RW-Reading and Writing, C-Communication, MF-Manipulation by Fingers, PP-Pulling and Pushing, L-Lifting, KC-kneeling And Croutching, ST- Standing, W-walking, BLA-Both legs and Arms, BA- Both Arms, OL-One leg, BL-Both leg, OA - One Arms, OAL - One Arms one leg, B- Blind, LV-Low Vision, H-Hearing, MW- Muscular Weakness

OH-Orthopedically Handicapped, CP, Cerebral Palsy, LC-Leprosy Cured , VH- Visually Handicapped, HH-Hearing Handicapped